## L. A. BILL No. XVII OF 2021.

A BILL

TO AMEND THE FARMERS (EMPOWERMENT AND PROTECTION) AGREEMENT ON PRICE ASSURANCE AND FARM SERVICES ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.

**शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२० चा २०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२०, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, याच्या कलम १ मधील पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०२० चा २०.

" (२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल. ".

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (क) च्या नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क-१ ) " अपील प्राधिकारी " याचा अर्थ, कलम १४ च्या पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अपील प्राधिकारी, असा आहे ; ";

(२) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ख-१) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, कलम १४ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे ; " ;

(३) खंड (ञ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ञ-१) " किमान आधारभूत किंमत " याचा अर्थ, केंद्र सरकारद्वारे पीक खरेदीसाठी घोषित केलेली किंमत, असा आहे ; ";

(४) खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ड) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये राज्य शासनाने करावयाच्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे ; ".

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ ला, त्याचा पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही पीक विक्री किंवा खरेदी यासाठीचा कृषी करार, दिलेली किंमत, किमान आधारभूत किंमती इतकी किंवा त्यापेक्षा अधिक असल्याखेरीज वैध असणार नाही :

परंतु, शेतकरी व पुरस्कर्ता यांच्या परस्पर संमतीने, पीक विक्री किंवा खरेदी या साठीचा कृषी करार, दोन वर्षाच्या कमाल कालावधीसाठी किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीने करता येईल :

परंतु असे की, पिकासाठी, जेथे किमान आधारभूत किंमत जाहीर केलेली नाही, तेथे कृषी कराराअन्वये शेतकऱ्यांना द्यावयाची किंमत शेतकरी व पुरस्कर्त्याच्या परस्पर संमतीने ठरविण्यात येईल. " .

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याचे कलम १४ बदली दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ ऐवजी, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवाद समझोत्याकरिता यंत्रणा.

" **१४.** (१) जेथे कृषि करारामध्ये अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे समेट प्रक्रियेसाठी तरतूद केलेली नाही, किंवा कृषि करारातील पक्षकार, समेट प्रक्रियेच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत उक्त कलमान्वये त्यांच्या विवादामध्ये समझोता करण्यात कसूर करतील तर, त्यानंतर अशा कोणत्याही पक्षकारास, कृषि कराराअन्वये विवादावर निर्णय देण्यासाठी विहित करण्यात येईल अशा सक्षम प्राधिकाऱ्याकडे जाता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, विवाद प्राप्त झाल्यानंतर, सक्षम प्राधिकारी,—

(क) जर कृषि करारामध्ये समेट प्रक्रियेची तरतूद केली नसेल तर, अशा विवादाच्या समझोत्याकरिता समेट मंडळ घटित करील ; किंवा

(ख) जर पक्षकार समेट प्रक्रियेद्वारे त्यांच्या विवादात समझोता करण्यात कसूर करतील तर, पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, असा विवाद प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संक्षिप्त रीतीने विवादावर निर्णय घेईल आणि, पुढील शर्तींच्या अधीन राहून त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, अशा शास्ती व व्याजासह विवादाअंतर्गत रकमेच्या वसुलीसाठी आदेश देईल :—

(एक) जेथे पुरस्कर्ता, शेतकऱ्यास देय असलेल्या रकमेचे प्रदान करण्यात कसूर करील तेथे, अशी शास्ती देय रकमेच्या दिडपटीने वाढविण्यात येईल ;

(दोन) जेथे कृषि कराराच्या अटींनुसार कोणतेही आगाऊ प्रदान किंवा उत्पन्नांची किंमत यामुळे पुरस्कर्त्याला देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठीचा आदेश शेतकरी विरोधात असेल तेथे, अशी रक्कम पुरस्कर्त्याने केलेल्या प्रत्यक्ष खर्चाहून अधिक असणार नाही ;

(तीन) जेथे विवादास्पद कृषि करारामध्ये अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे, किंवा शेतकऱ्याकडून दैवी आपत्तीमुळे कसूर झाली असेल तेथे, शेतकरी विरोधात रक्कम वसुलीसाठीचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (४) अन्वये, अपील दाखल केले असल्याखेरीज, या कलमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे संमत केलेल्या प्रत्येक आदेशाचा प्रभाव हा दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्यास असतो
१९०८ चा ५. त्याप्रमाणे असेल आणि तो दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत हुकुमनामा असल्याप्रमाणे त्याच रीतीने अंमलबजावणीयोग्य असेल.

(४) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे व्यथित झालेला कोणताही पक्षकार, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करील.

(५) अपील प्राधिकारी, तीस दिवसांच्या आत अपील निकालात काढील.

(६) या कलमान्वये अपील प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या प्रत्येक आदेशाचा दिवाणी न्यायालयाच्या
१९०८ चा ५. हुकूमनाम्यास असतो तसाच प्रभाव असेल आणि तो दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये हुकूमनामा असल्याप्रमाणे त्याच रीतीने अंमलबजावणीयोग्य असेल.

(७) सक्षम प्राधिकारी, किंवा यथास्थिति, अपील प्राधिकारी यांनी पारित केलेल्या कोणत्याही आदेशान्वये प्रदेय असलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(८) सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा अपील प्राधिकाऱ्यास, या कलमाखालील विवादांवर निर्णय घेताना, साक्षीदाराची शपथेवर साक्ष घेण्याच्या, उपस्थित राहण्यास भाग पाडण्याच्या, दस्तऐवज व अन्य महत्त्वपूर्ण साधनांचा शोध घेण्यास भाग पाडण्याच्या व ते सादर करण्याच्या प्रयोजनासाठी आणि विहित करण्यात येईल अशा इतर प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.

(९) सक्षम प्राधिकाऱ्यासमोर याचिका किंवा अर्ज आणि अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करण्याची रीत व कार्यपद्धती विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल.” .

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, " उप-विभागीय प्राधिकारी " या मजकुराऐवजी, "सक्षम प्राधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १८ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, " उप-विभागीय प्राधिकारी " या मजकुराऐवजी, "सक्षम प्राधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १९ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, " उप-विभागीय प्राधिकारी " या मजकुराऐवजी, "सक्षम प्राधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० यामध्ये नवीन कलम २१क समाविष्ट करणे.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

शेतकऱ्याच्या छळवणुकीसाठी शिक्षा.

**"२१क.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखादा पुरस्कर्ता शेतकऱ्याची छळवणूक करीत असेल आणि असा पुरस्कर्ता शेतकऱ्याच्या छळवणुकीच्या अपराधासाठी दोषी ठरला तर तो, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनासाठी जेथे पुरस्कर्ता, कृषि करारानुसार, वेळेत शेतकऱ्याला रक्कम प्रदान करण्यात कसूर करीत असेल किंवा शेतकऱ्याला संमत मोबदला देण्यात कसूर करीत असेल तर, त्याने छळवणुकीचा अपराध केला असल्याचे मानण्यात येईल." .

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० याचे कलम २३ बदली दाखल करणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

**"२३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही." .

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**११.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ५४२—२ (८४५—७-२०२१)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

संसदेने, न्याय्य व पारदर्शक रीतीने कृषि सेवांसाठी व परस्पर संमत केलेल्या किफायतशीर मूल्य आराखड्याप्रमाणे आगामी कृषि उत्पन्नाच्या विक्रीसाठी, शेतकऱ्यांना कृषि व्यवसाय संस्था, प्रक्रीयक, घाऊक व्यापारी, निर्यातदार किंवा मोठे किरकोळ विक्रेते यांच्यासोबत वचनबद्ध करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्या व त्यांचे सक्षमीकरण करणाऱ्या कृषी करारावरील राष्ट्रीय आराखड्यासाठी तरतूद करण्यासाठी, शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२० (२०२० चा केंद्रीय अधिनियम क्रमांक २०), (यात यापुढे ज्याचा निर्देश "केंद्रीय अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा अधिनियमित केलेला आहे.

२. केंद्रीय अधिनियमामध्ये, किमान आधारभूत किमतीवर कृषि करार करण्यासाठी कोणतीही तरतूद नाही. कलम १४ मध्ये शेतकऱ्यांसाठी विवाद निवारण यंत्रणेची तरतूद आहे. उक्त कलमामध्ये शेतकरी आणि पुरस्कर्ता यांच्यामधील विवादांचे निवारण करण्यासाठी उप-विभागीय दंडाधिकारी हा सक्षम प्राधिकारी आहे आणि जिल्हाधिकारी हा अपील प्राधिकारी आहे. उप-विभागीय दंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांसारख्या महसूल प्राधिकाऱ्यांवरील कामाचा भार विचारात घेता, शेतकरी व पुरस्कर्ता यांच्यामधील विवादांचे निवारण करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ देणे शक्य होणार नाही. शेतकऱ्याला त्याच्या कृषी उत्पन्नाची किंमत वेळेत मिळेल असा विश्वास देण्यासाठी पुरस्कर्त्याला शिक्षा देण्याची तरतूद करणे प्रस्तावित आहे.

३. शेतकऱ्यांच्या हिताचे प्रभावीपणे संरक्षण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्याला लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट वाटते, या विधेयकामध्ये पुढील सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत,—

(क) कलम ५ मध्ये , असे प्रस्तावित केले आहे की,—

(एक) किमान आधारभूत किंमतीइतकी किंवा त्यापेक्षा अधिक किंमत शेतकऱ्याला प्रदान केल्याखेरीज कृषि करार वैध असणार नाही ;

(दोन) शेतकरी व पुरस्कर्ता हे परस्पर संमतीने दोन वर्षांच्या कमाल कालावधीसाठी किमान आधारभूत किमतीहून कमी किंमतीचे कृषी करार करू शकतील ;

(तीन) किमान आधारभूत किंमत जाहीर केलेली नसेल त्या पिकांसाठी शेतकरी व पुरस्कर्ता यांना परस्पर संमत किंमतीने कृषि करार करता येतील ;

(ख) कलम १४ मध्ये, शेतकरी व पुरस्कर्ता यांच्यामधील कृषि करारातून उद्भवणाऱ्या कोणत्याही विवादाच्या बाबतीत पक्षकारांना विवाद निर्णयासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे जाता येईल. सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याची तरतूद देखील केली आहे ;

(ग) शेतकऱ्याची छळवणूक केल्यास, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कारावासाच्या शिक्षेची देखील तरतूद केली आहे ;

(घ) राज्य शासनाद्वारे नियम करण्याच्या अधिकाराची देखील तरतूद केली आहे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ६ जुलै २०२१.

**दादाजी भुसे,**
कृषि मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(३)**.—या खंडान्वये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २**.—या खंडान्वये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, याच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५**.—मुख्य अधिनियमाच्या कलम १४ बदली दाखल करण्याचा उद्देश असलेल्या या खंडान्वये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये, सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी अपील प्राधिकारी विहित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ग) पोट-कलम (८) मध्ये, या कलमान्वये विवादावर निर्णय घेण्यासाठी, अशी इतर प्रयोजने विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे;

(घ) पोट-कलम (९) मध्ये, सक्षम प्राधिकाऱ्यासमोर अर्ज आणि अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करण्याची रीत व कार्यपद्धती विहित करण्याचा अधिकार, राज्यशासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०**.—मुख्य अधिनियमाचे कलम २३ बदली दाखल करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, पोट-कलम (१) मध्ये, उक्त अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११(१)**.—या खंडान्वये, अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास ती दूर करण्यासाठी, **राजपत्रामध्ये** आदेश निर्गमित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे उपरोल्लिखित प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

**सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक १७.—शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत आश्वासन करार व कृषि सेवा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.**

**[शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत आश्वासन करार व कृषि सेवा अधिनियम, २०२० यातील उतारे.]**

**(सन २०२० चा अधिनियम क्रमांक २० )**

**१.** (१) * * * *

(२) तो, दिनांक ५ जून २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) ते (ठ) * * * *

(ड) ''विहित'' याचा अर्थ या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे.

(ढ) ते (त) * * * *

**३.** ते **१३.** * * * *

**१४.** (१) कृषि करारामध्ये, कलम १३ च्या पोट-कलम (१) खालील आवश्यकतेप्रमाणे समेट प्रक्रियेची तरतूद केली नसेल किंवा त्या कृषि करारातील पक्षकारांनी तीस दिवसांच्या आत, त्या कलमान्वये आपला विवाद मिटवला नसेल तेव्हा, त्याबाबतीत अशा कोणत्याही पक्षकारास, संबंधित उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडे जाता येईल, असा उप विभागीय अधिकारी हा, कृषि कराराखालील विवादांवर निर्णय करण्यासाठी उप विभागीय प्राधिकारी असेल. विवाद निवारण यंत्रणा.

(२) पोट-कलम (१) खालील विवाद मिळाल्यावर, उप विभागीय प्राधिकाऱ्यास, जर,—

(क) कृषि करारात समेट प्रक्रियेची तरतूद केली नसेल तर, अशा विवादाची तडजोड घडवून आणण्यासाठी एक समेट मंडळ घटित करता येईल; किंवा

(ख) पक्षकारांनी समेट प्रक्रियेद्वारे आपला विवाद मिटविला नाही तर, असा विवाद मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, संक्षिप्त रीतीने विवादाचा निर्णय करता येईल, आणि विवादीत रकमेची वसुली पुढील शर्तीच्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल अशी शास्ती व दंडासह, विवादीत रकमेची वसुली करण्याचा आदेश देता येईल :—

(एक) शेतकऱ्याला देय असलेली रक्कम प्रदान करण्यात प्रायोजकाकडून कसूर होईल त्याबाबतीत, अशा शास्तीची रक्कम ही, देय रकमेच्या दीडपटी इतकी असू शकेल ;

(दोन) कृषि कराराच्या अटींनुसार कोणतीही आगाऊ रक्कम किंवा निविष्टांचा खर्च यापोटी प्रायोजकाला देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी शेतकऱ्याविरुद्ध आदेश दिला असेल त्याबाबतीत, अशी रक्कम ही, प्रायोजकाने प्रत्यक्ष खर्च केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही ;

(तीन) विवादीत कृषि करारामुळे या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाले असेल, किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याकडून कसूर झाली असेल तेव्हा, त्याबाबतीत शेतकऱ्याविरुद्ध रक्कम वसुलीचा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(३) या कलमान्वये उप विभागीय प्राधिकाऱ्याकडून देण्यात येणाऱ्या प्रत्येक आदेशाचा, पोट-कलम (४) अन्वये अपील दाखल झाले नाही तर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील एखाद्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याइतकाच प्रभाव असेल आणि तो, त्या हुकूमनाम्याप्रमाणेच अंमलबजावणीयोग्य असेल.

(४) उप विभागीय प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही पक्षकारास, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल, जिल्हाधिकारी किंवा त्या जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेला अपर जिल्हाधिकारी हा अशा अपील प्राधिकाऱ्याचे स्थान भूषवील.

(५) अपील प्राधिकारी तीस दिवसांच्या आत ते अपील निकालात काढील.

(६) या कलमान्वये अपील प्राधिकाऱ्याकडून देण्यात येणाऱ्या प्रत्येक आदेशाचा, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील एखाद्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याइतकाच प्रभाव असेल आणि तो, त्या हुकूमनाम्याप्रमाणेच अंमलबजावणीयोग्य असेल.

(७) उप विभागीय प्राधिकाऱ्याकडून किंवा, यथास्थिति अपील प्राधिकाऱ्याकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशान्वये देय असलेली रक्कम ही, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली योग्य असेल.

(८) उप विभागीय प्राधिकाऱ्यास किंवा अपील प्राधिकाऱ्यास, या कलमाखालील विवादांचा निर्णय करताना, शपथेवर साक्षीपुरावा घेणे, साक्षीदारांना हजर राहण्यास फर्मावणे, दस्तऐवज व भौतिक वस्तू यांचा शोध घेण्यास भाग पाडणे या प्रयोजनांसाठी आणि केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा अन्य प्रयोजनांसाठी, एखाद्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

(९) उप विभागीय प्राधिकाऱ्यापुढे एखादा विनंतीअर्ज किंवा अर्ज आणि अपील प्राधिकाऱ्यापुढे अपील दाखल करण्याची रीत व कार्यपद्धती ही, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल त्या प्रमाणे असेल.

**१५.** व **१६.** * * * *

अधिनियमाखालील प्राधिकारी लोक सेवक असणे.

**१७.** या अधिनियमान्वये नेमलेले किंवा विहित केलेले नोंदणी प्राधिकारी, उप विभागीय प्राधिकारी आणि अपील प्राधिकारी यांसह, सर्व प्राधिकारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोक सेवक असल्याचे मानले जाईल.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१८.** या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, केंद्र सरकार, राज्य शासन, नोंदणी प्राधिकारी, उप विभागीय प्राधिकारी, अपील प्राधिकारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती, यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

दिवाणी न्यायालयाच्या अधिकारीतेस रोध.

**१९.** कोणत्याही दिवाणी न्यायालयास, ज्या विवादासंबंधात या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये एखाद्या उप विभागीय प्राधिकाऱ्याला किंवा अपील प्राधिकाऱ्याला निर्णय करण्याचा अधिकार प्रदान केला असेल अशा कोणत्याही विवादासंबंधातील कोणताही वाद किंवा कार्यवाही विचारार्थ स्वीकरण्याची अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा त्यांखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारास अनुसरून केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात. कोणत्याही न्यायालयाकडून किंवा इतर प्राधिकाऱ्याकडून कोणताही मनाई हुकूम दिला जाणार नाही.

**२०.** ते **२२.** * * * *

राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

**२३.**(१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(क) कलम ६ च्या पोट-कलम (४) अन्वये शेतकऱ्याला रक्कम प्रदान करण्याची पद्धत व रीत;

(ख) कलम १२ च्या पोट-कलम (२) अन्वये नोंदणी प्राधिकारी नेमणे, त्याची रचना, अधिकार व कार्ये, आणि नोंदणीची कार्यपद्धती;

(ग) राज्य शासनाकडून, नियमांद्वारे, विहित करावयाची, किंवा विहित करता, किंवा ज्या बाबतीत तरतूद करावयाची असेल, अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहे मिळून बनलेले असेल तेथे त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे, किंवा जेथे असे विधानमंडळ एका सभागृहाने बनलेले असेल, तेथे त्या सभागृहापुढे, ठेवण्यात येईल.

**२४.** ते **२५.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७. ]**

**[ शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. दादाजी भुसे,**
कृषि मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई